**<u>ठळक बातम्या</u>**

- युद्धाच्या काळात देशातल्या नागरिकांनी एकजूट कायम ठेवावी आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

- अशोक खरातशी संबंध असलेल्या सर्वांवर कारवाई करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

- सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीतल्या पोलिसांच्या भूमिकेप्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन, पोलीस अधीक्षकांच्या निलंबनाचे विधानपरिषद उपसभापतींचे निर्देश

**आणि**

- हवामान विभागाकडून कोकणात उष्णतेच्या लाटेचा इशारा, पश्चिम महाराष्ट्रात अवकाळी पावसाचा अंदाज

**<><><><><>**

आखाती देशांमध्ये युद्ध सुरू असताना देशातल्या नागरिकांनी एकजूट रहावं आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. यामुद्द्यावर त्यांनी आज लोकसभेत निवेदन केलं. देशातला पेट्रोल, डिझेल आणि गॅस पुरवठा प्रभावित होऊ नये यासाठी सरकार शक्य तिथून इंधनाची खरेदी करत आहे. तेल, गॅस, खतांसाठी आवश्यक सामान घेऊन येणारी जहाजं देशात सुरक्षित येण्यासाठी यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं ते म्हणाले. या युद्धामुळं भारतासह जगातल्या सर्व देशांसमोर संकट उभं राहिल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड - प्रधानमंत्री बाइट**

युद्धाचा शेतकऱ्यांवर परिणाम होऊ नये यासाठी सरकार कटीबद्ध आहे. यासाठी शेतकऱ्यांना शक्य ती सर्व मदत करत राहू असं ते म्हणाले. लोकांना युद्धाची कमीत कमी झळ बसावी यासाठी सरकारनं गेल्या काही वर्षात केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. त्याचवेळी काळाबाजार, साठेबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी सर्व राज्य सरकारांना केलं.

युद्ध सुरू झाल्यापासून प्रभावित देशांमधले पावणे ४ लाख भारतीय मादयदेशी परतले आहेत. इराणमधून १ हजार लोकं परतल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. चर्चा आणि शांततेच्या मार्गाने युद्धावर तोडगा काढला जावा या भारताच्या भूमिकेचा त्यांनी यावेळी पुनरुच्चार केला.

**<><><><><>**

भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात ज्यांचा दुरान्वयेही संबंध असेल त्यांना सोडणार नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. खरातनं तथाकथित शक्तींचा दुरुपयोग करत अनेक महिलांसोबत दुष्कृत्य केलं, पण अनेक महिला घाबरून समोर यायला तयार नव्हत्या. आता काही महिलांनी तक्रार केली आहे. हे प्रकरण अतिशय गंभीर असून पोलीस याप्रकरणी कारवाई करत आहेत. हा राजकारणाचा मुद्दा नसून महिलांच्या प्रतिष्ठेचा हा प्रश्न आहे, त्यामुळे यावर उद्या आपण सभागृहात सविस्तर निवेदन देणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

त्याआधी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी हा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. या भोंदूबाबाशी अनेक अधिकारी आणि मंत्र्यांचेही संबंध होते. या सर्वांचे राजीनामे घेऊन त्यांना सहआरोपी करा, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली. यामुळे महाराष्ट्राची बदनामी झाली आहे, असं ते म्हणाले. नाना पटोले आणि भास्कर जाधव यांनीही याचा पुनरुच्चार केला. या विषयावर सभागृहात अल्पकालीन चर्चा घडवून आणावी, अशी मागणी त्यांनी केली. मात्र ही मागणी अध्यक्षांनी फेटाळून

लावली. यानंतर शिवसेनेच्या आमदारांनी हौद्यात उतरून गदारोळ केला. या गदारोळातच महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन कायदे सुधारणा विधेयक मांडण्यात आलं.

**<><><><><>**

भोंदू बाबा अशोक खरात याच्यावर काल रात्री नाशिकच्या सरकारवाडा पोलिसांनी तिसरा गुन्हा दाखल केला. एका 33 वर्षाच्या पीडितेनं त्याच्या विरोधात तक्रार केल्यानंतर विशेष चौकशी पथकाकडून नाशिक पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हा शाखेनं त्याला ताब्यात घेतलं आणि त्याची चौकशी केली.

**<><><><><>**

विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात आज सकाळी सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीतल्या पोलिसांच्या भूमिकेचा मुद्दा चर्चेला आला. याप्रकरणी चौकशी करुन योग्य कारवाई करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधानसभेत दिलं. तर विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी याप्रकरणी पोलीस अधीक्षकांच्या निलंबनाचे निर्देश दिले. दरम्यान, मात्र सभापती राम शिंदे यांनी निलंबनाचा निर्णय राखून ठेवला आहे. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

## होल्ड व्हाइस कास्ट

*(सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मतदान करण्यापासून दोन सदस्यांना पोलिसांनी रोखल्याप्रकरणी आज सकाळी कामकाज सुरू होण्यापूर्वी शिवसेनेच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केलं. मंत्री शंभुराज देसाई आणि आमदार अर्जुन खोतकर यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला. शिवसेनेच्या सदस्यांना निवडणूकीचा व्हिप बजावण्यासाठी आपण गेलो होतो, आपल्यासोबत दोन सदस्य होते. मात्र पोलिसांनी या सदस्यांना मतदान करण्यासाठी जाऊ दिलं नाही, तसंच आपल्याला धक्काबुक्की केली, यात आपल्याला मार लागला असं शंभूराज देसाई यांनी सांगितलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही देसाई यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला. असा प्रकार होणार असल्याचं समजल्यामुळं पोलीस महासंचालकांना याची कल्पना आधीच दिली होती. संबंधित सदस्यांवर गुन्हा दाखल असला तरी मतदानापासून कुणालाही वंचित ठेवता येत नाही, त्यामुळे त्यांना मतदान करू द्यावे असं आपण सांगितल्याचं शिंदे म्हणाले. तरीही त्यांना रोखण्यात आलं, हा लोकशाहीचा खून आहे असा आरोप उपमुख्यमंत्र्यांनी विधानसभेत केला. याप्रकरणी चौकशी करुन योग्य कारवाई करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिलं.*

*विधानपरिषदेत हेमंत पाटील यांनी हा मुद्दा उपस्थित केला. शंभुराज देसाई यांनी या घटनेचं सविस्तर वर्णन केलं आणि राज्यात मंत्रीही सुरक्षित नाहीत का, असा प्रश्न उपस्थित केला. पोलीस अधिकाऱ्यांच्या निलंबनाबरोबरच, उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांमार्फत या घटनेची सखोल चौकशी करावी आणि मंत्र्यांना धक्काबुक्की करणाऱ्या सुमारे 100 पोलीस कर्मचाऱ्यांनाही निलंबित करावं, अशी मागणी देसाई यांनी केली. त्यावर साताऱ्याचे पोलीस अधीक्षक आणि संबंधितांना निलंबित करण्याचे निर्देश उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सरकारला दिले. या निर्देशांचं तंतोतंत पालन सरकार करेल, असं आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिलं. ही घटना जिथे घडली, त्या जिल्हा परिषदेच्या इमारतीतलं CCTV फुटेज सुरक्षित राहील, हे जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांनी सुनिश्चित करावं, असे निर्देशही उपसभापतींनी दिले. )*

***विधानसभेतून कौस्तुभ पटाईतसह अंकिता आपटे, विधानपरिषद मुंबई***

**<><><><><>**

मुंबईत गेल्या काही काळात धाडी टाकून वर्सोवा आणि अंधेरी इथं दुधात भेसळ करणाऱ्या १४ जणांवर गुन्हे दाखल केले असून त्यांच्यावर संघटित गुन्हेगारीसाठीच्या मकोकाअंतर्गत गुन्हे दाखल केले जातील, अशी घोषणा अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी आज विधानपरिषदेत केली. मनीषा कायंदे यांनी याबाबतचा तारांकित प्रश्न उपस्थित केला होता.

वन्य जीव संरक्षण महाराष्ट्र सुधारणा विधेयक, २०२६ आज विधानपरिषदेनं एकमतानं मंजूर केलं.

**<><><><><>**

माजी खासदार दत्ता मेघे यांचं काल नागपूर इथं निधन झालं, ते ८९ वर्षांचे होते. राजकारण, शिक्षण या क्षेत्रामध्ये आपली छाप उमटवणाऱ्या दत्ता मेघे यांनी विदर्भातल्या राजकारणात महत्वाचं स्थान निर्माण केलं होतं. त्यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी अंत्यसंस्कार होणार आहेत.

**<><><><><>**

ठाणे पोलीसांनी क्रिप्टो एक्सचेंज कॉइन डीसीएक्स कंपनीचे सह-संस्थापक सुमित गुप्ता आणि नीरज खंडेलवाल यांना सुमारे ७१ कोटी ६० लाख रुपयांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणी अटक केली आहे. या दोघांसह आणखी काही जणांच्या विरोधात ठाण्यातल्या मुंब्रा पोलीस स्थानकात फसवणूक, विश्वासघात आणि

घोटाळ्याच्या आरोपाखाली एफआयआर दाखल करण्यात आला होता, त्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.  मुंब्रा पोलिसांच्या पथकानं शनिवारी बंगळूरु इथून या दोघांना अटक केली आणि त्यांना  ठाण्यात आणलं.

<><><><><>

बॉलिवुड अभिनेता शाहरुख खान याचा मुलगा आर्यन खान याला अमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी क्लीन चिट मिळवून देण्यासाठी लाच मागितली नव्हती, असं या संदर्भात वादग्रस्त ठरलेले माजी पोलीस अधिकारी समीर वानखेडे यांनी आज मुंबई उच्च न्यायालयात सांगितलं. याप्रकरणी २५ कोटी रुपये लाच मागितल्याचा आरोप वानखेडे यांच्यावर आहे.

<><><><><>

धुळे पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकानं आज पश्चिम पवन नगर आणि मोहाडी येथील दंडेवाले बाबा नगरमधून तब्बल एक कोटी ४३ लाख रुपये किमतीचा गांजासदृश अंमली पदार्थ जप्त केला. या प्रकरणी दोघांवर गुुन्हा दाखल केल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

आंब्याला हेक्टरी ५ लाख आणि काजूसाठी हेक्टरी ३ लाख रूपये भरपाई मिळावी या मागणीसाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या  आंबा-काजू बागायतदारांनी आज नांदगाव इथं मुंबई-गोवा महामार्ग रोखून धरला. शेतकरी नेते माजी आमदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आलं. लवकरच या समस्येवर तोडगा काढला जाईल, असं लेखी आश्वासन सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आलं.

<><><><><>

कोकणात तुरळक ठिकाणी उद्यापर्यंत उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. पालघर आणि रत्नागिरी जिल्ह्यांमधे आज तापमानात मोठी वाढ होईल.  मुंबईसह ठाणे, रायगड, आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात उष्मा वाढेल. पश्चिम महाराष्ट्रात सातारा आणि  सांगली जिल्ह्यात आज तर सोलापूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी येत्या तीन दिवसात सोसाट्याचे वारे वाहतील तसंच मेघगर्जनेसह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. मराठवाड्यात नांदेड, लातूर, धाराशीव या जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी येत्या तीन दिवसात विजेच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे.

**//<><><><><>//**